MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –५० | बुधवार दि.०६ नोव्हेंबर २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -50 | WEDNESDAY DT.06 NOVEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## केज मतदारसंघाच्या अखंडीत विकासासाठी जनतेने आम्हाला पुन्हा एकदा संधी द्यावी–आ. नमिता मुंदडा

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात स्वर्गीय विमलताई मुंदडा यांच्या ३५ वर्षांच्या यशस्वी कारकिर्दीनंतर मध्यंतरी मागे पडलेला केजचा विकास हा २०१९ च्या निवडणूकीत आ. नमितीताई मुंदडा यांच्या रूपात पुन्हा परत आला. त्यामुळे विकासनिधी कसा खेचून आणायचा हा फक्त मुंदडा कुटूंबांचा हातखंडा असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. ५ नोव्हेंबर रोजी केज मतदारसंघातील प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने आ.नमिता मुंदडा यांनी दीपेवडगाव, पळसखेडा, बोरीसावरगाव, कानडी बदन, कौडगाव या गावांना भेट दिली व सर्वांशी संवाद साधला. या प्रसंगी भारतीय जनता पक्ष आणि महायुतीचे सन्माननीय नेते,

पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वर्गीय विमलताई मुंदडा यांच्यानंतर गेल्या अडीच वर्षांत महायुतीचे सरकार आल्यापासून आ. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली व ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा आणि युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली आ. नमिता मुंदडा यांनी भरघोस निधी आणून मतदारसंघातील प्रत्येक वाडी, वस्ती, तांडा यापासून शहरापर्यंत रस्ते, विज, पाणी घेऊन जाण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला व त्या यशस्वी सुद्धा झाल्या. त्यामुळेच या निवडणुकीत विधानसभेत आमदार नमिताताई मुंदडा यांच्याशिवाय पर्याय दिसत नसल्याचे लोकांचे मत झाले आहे. म्हणूनच के ज मतदारसंघातील वाड्या, वस्त्यापासून शहरापर्यंत सर्व जनता म्हणतेय म्हणतेय कहो दिल से... नमिताताई फिरसे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवारांच्या गटाकडून जाहीरनामा डॉक्टर योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते जाहीर करण्यात आला

**बीड (प्रतिनिधी)**

**गेली अनेक वर्ष माझे वडील डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी बीडच्या नगराध्यक्षपदी काम केलेले आहे. त्यामुळे त्यांचा आणि माझाही जनसंपर्क हा बीड शहरात होता. पण आता आम्हाला ग्रामीण भागातूनही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील जनताही आमच्यासोबत आहे. ना.अजितदादा यांच्या नेतृत्वाखाली बीड मतदारसंघाचा विकास होईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष तथा महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या हस्ते मुंबईतून बुधवारी (दि.६) पक्षाच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन करण्यात आले. तर बीडमधून पक्षाच्या संपर्क कार्यालयात प्रकाशन सोहळ्यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वात प्रकाशन करण्यात आले.यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, बीडचे महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष ड.प्रज्ञा खोसरे, माजी नगरसेवक गणेश वाघामारे, बाबुराव दुधाळ, प्रेम चांदणे, रणजित बनसोडे, भास्कर जाधव, राष्ट्रवादी डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, युवक तालुकाध्यक्ष नंदू कुटे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने अद्ययावत आरोग्य सुविधेचा वादा, सर्वांनी शिक्षणाच्या पायाभरणीचा वादा, दर्जेदार आणि पायाभूत सुविधांचा वादा, शेती व शेतकऱ्यांच्या




विकासाचा वादा, सामाजिक विकासाचा वादा, असे सगळे वादे ना.अजितदादा पवार हे या निवडणुकीत घेऊन आलेले आहेत. त्यांच्या दूरदृष्टी नेतृत्वात महाराष्ट्र राज्याचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. आजपर्यंत आपणही बीड शहरात, ग्रामीण भागात असतील, ज्या काही सुविधा उपलब्ध करून देऊ शकलो, त्या ना.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली आतापर्यंत देऊ शकलेलो आहोत. यापुढेही बीड तालुका, शिरूर तालुक्याच्या भागात मोठ्या प्रमाणावर विकासकामे करण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्वांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठीशी भरभक्कमपणे उभे राहावे, असे आवाहन देखील डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

### राष्ट्रवादीचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष आ.इद्रिस नाईकवडी यांचे जंगी स्वागत

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष तथा आमदार इद्रिस नाईकवडी हे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांचे बीडमध्ये आगमन झाल्यानंतर जंगी स्वागत करण्यात आले. त्यांनी अल्पसंख्याक समाजातील नागरिकांशी संवाद साधला. त्यांचे बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने डॉ. योगेश क्षीरसागर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. ते अल्पसंख्याक समाजाच्या मेळाव्याला संबोधित करणार होते. कार्यक्रमासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

## लबाड क्षीरसागरांपासून बीडकरांची सुटका करण्यासाठी अनिलदादा समर्थकांची वज्रमठ

**बीड ।प्रतिनिधी**

**गेल्या चाळीस वर्षांपासून बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या लबाड क्षीरसागरांना धडा शिकवायचा असेल तर आता अठरा पगड जाती–धर्मातील माणसांची एकजूट होणे गरजेचे आहे. आलटून–पालटून क्षीरसागरांचे नवनवीन चेहरे समोर येतात, विकास पुरुष म्हणून स्वतःची ब्रँडिंग करतात आणि सामान्य जनतेला लुटत राहतात. सत्ता स्वतःच्या घरात टिकवून ठेवण्यासाठी क्षीरसागर आपापसात भांडण्याचे नाटकं करून बीडकरांची दिशाभूल करतात. मात्र लक्षात ठेवा हे सगळे क्षीरसागर एकच आहेत. आजवर जे झालं ते झालं पण आता ही वेळ क्रांतीची आणि परिवर्तनाची आहे. बीडवासियांचे मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी, बीड विकसाचा कायापालट करण्यासाठी एकजुटीने कामाला लागा. असे आवाहन बीड विधानसभा अपक्ष उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांनी आपल्या समर्थक आणि कार्यकर्त्यांना केले.**

काल दि. ५ नोव्हेंबर रोजी दुपारच्या सुमारास मराठा संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील समर्थक, मराठा सेवक तसेच सर्व जाती–धर्मातील अनिलदादांच्या समर्थकांनी मिळून बीड शहरातील जालना रोड वरील अनिलदादा जगताप मध्यवर्ती कार्यालय येथे विधानसभा पूर्व नियोजन तथा निश्चय बैठकीचे आयोजन केले होते.



### ही वेळ क्रांतीची, बीडवासियांचे मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी एकजुटीने कामाला लागा– अनिलदादा जगताप

याप्रसंगी अनिलदादा जगताप यांनी उपस्थित राहून सर्वांशी मुक्त संवाद साधत पुढील दिशा, ध्येयधोरण यावर सविस्तर चर्चा केली. बैठकीचे प्रास्ताविक प्रतिक कांबळेयांनी केले तर गणेश मस्के, संदीपान बडगे, साहेबराव पोपळे, मधुकर शिंदे महाराज, मुकेश रसाळ, किशोर गिराम, प्रदीप माने, संतोष जाधव, सुनिल सुरवसे, महादेव रकटे, प्रकाश खांडे सर, पप्पूजी बरीदे या सर्वांनी मिळून अनिलदादांना विजयाचे समीकरण जुळवून आणण्यासाठी शहर–गावखेड्यात कोणत्या योजना/यंत्रणा राबविणे अत्यावश्यक आहे यांसदर्भात मार्गदर्शन सूचना केल्या तसेच अनिलदादा केवळ तुम्हीच आपल्या बीडवासियांना क्षीरसागरांच्या तावडीतून वाचवू शकता, आम्ही जीवाचं रान करू पण यंदा विजयाचा गुलाल तुमच्या कपाळी लावू आणि बीड क्षीरसागर मुक्त करण्यासाठी लढा देऊ असा ठाम निश्चय या बैठकीत सर्व जाती–धर्मातील बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांच्या समर्थकांनी केला. याप्रसंगी मराठा संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील समर्थक, मराठा सेवक तसेच सर्व जाती–धर्मातील माणसं उपस्थित होते.

# डॉ योगेश क्षीरसागराना आमदार करण्यासाठी जनता सरसावली

बीड (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बीड शहरात पहिलीच जाहीर सभा आहे. मागील एक वर्षापासून बीड मतदारसंघाचा आढावा घेतोय. शहरातील प्रभाग १, ९, १० या भागात सुरू असलेले कामे टक्केवारीसाठी आमदारांनी बंद पाडले. जनतेला वेठीस धरण्याचे काम केले. आपल्या पदाचा वापर लोकांच्या हितासाठी करावा, असं त्यांना कधीही सुचले नाही, असा घणाघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केला.

बीड विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ मतदारसंघात सभांचा धडाका सुरू आहे. मंगळवारी (दि.५) सायंकाळी बीड शहरात सभा पार पडली. यावेळी ते संबोधित करत होते.व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, डॉ.लक्ष्मण जाधव, अनिल चांदणे, विलास बामणे, माजी नगराध्यक्ष बाबूराव दुधाळ, प्रा.किशोर काळे, सुभाष सपकाळ, रमेश चव्हाण, गणेश वाघमारे, रवींद्र कदम, रंजीत बनसोडे, बाळासाहेब आंबेकर, संध्या राजपूत, शालिनीताई परदेशी, शाकेरा शेख, धनंजय काळे, अशोल काळे, ड.महेश गर्जे, मोहन आघाव, राहुल आघाव, विनोद हातागळे आदींची उपस्थिती होती.डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, शहरातील भागातून कॅनॉल रोड भागात रस्ते केले. विकासाची अनेक कामे यापूर्वी केलेली आहेत. या भागातून अनेक टिप्पर हे अवैधरित्या चालतात, हे सर्व कोणाचे आहेत. हे सर्वांना चांगलेच माहीत आहे. मात्र २० तारखेनंतर एकही टिप्पर, अवैध गाडी या रस्त्यावर दिसणार नसल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी ठणकावून




सांगितले. येत्या २ वर्षात बीड मतदारसंघातील उर्वरित सर्व कामे पूर्ण करू असे आश्वासन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी यावेळी दिले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.उच्चशिक्षित नेतृत्व डॉ.योगेश क्षीरसागर यांना निवडून द्या : डॉ.लक्ष्मण जाधव केंद्र सरकारने सर्व सामान्य घटकांसाठी अनेक उपाययोजना आणल्या आहेत. राज्य सरकारने आणल्या आहेत. डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघासाठी विविध शासकीय योजनेतून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध केला. डॉ.योगेश क्षीरसागर हे वंचित पीडित उपेक्षित लोकांसाठी काम करत आहेत. सर्व जाती धर्माला सोबत घेऊन चालणारे उच्चशिक्षित युवा नेतृत्व डॉ.योगेश क्षीरसागर यांना निवडून द्यायचं आहे. आपण जी चूक लोकसभेत केली ती चूक विधानसभेत न करता डॉ.योगेश क्षीरसागर यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणायचे आहे, असे आवाहन भाजपचे डॉ.लक्ष्मण जाधव यांनी केले आहे.क्षीरसागर कुटुंबाने कधीच जातीपातीचे राजकारण केले नाही : इकबाल शेख क्षीरसागर कुटुंबाने कधीच जातीपातीचे राजकारण केले नाही. मागील पाच वर्षात आमदाराने शहर, ग्रामीण भागात कसलाच विकास केला नाही. आता डॉ.योगेश क्षीरसागर यांना संधी देऊन आमदार करायचे आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने वॉर्डमध्ये जाऊन सर्व सामान्य नागरिकांपर्यंत जाऊन त्यांच्याकडून मतदान करून घ्यायचे आणि विकासकामे करणाऱ्या डॉ.योगेश क्षीरसागर यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष इकबाल शेख यांनी केले.

### ग्रामीण भागातून शेकडो तरुणांचे प्रवेश

नाळवंडी गटातील पिंपळगाव मांजरा येथील शिवाजी राऊत, गणेश भिसे, सोमनाथ राऊत, रामेश्वर राऊत, रामनाथ राऊत, सिद्धेश्वर राऊत, अनिल राऊत, मैंदा येथील युवा कार्यकर्ते सुभाष मोमीन, विलास पवार, विश्वनाथ राठोड, दहिफळचे युवा कार्यकर्ते पंडित जाधव, अशोक जाधव, निर्मळवाडीचे वचिष्ट वाणी, नारायण वाणी, काळेगाव हवेली (तांडा) येथील कल्याण पवार, बंडू राठोड, भगवान पवार, हरिभाऊ पवार, शिवणीचे शैलेंद्र शिंदे, बळीराम शिंदे, रवी वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली राजेश डोळस, विकास डोळस, रोहन डोळस, सोमनाथ गायकवाड, उत्तम धुमाळ, सोमनाथ घोडके, गोकुळ शिंदे या प्रमुख कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. ब्रह्मगाव येथील दिलीप ठाकूर, सुनील ठाकूर, लखन ठाकूर, धोंडीसिंग ठाकूर, अर्जुन ठाकूर, दिनेश ठाकूर, अभिजीत ठाकूर, विवेक गंगावणे, महादेव जाधव, राजाराम बनसोडे, दत्ता बिडवे, कुटेवाडीचे नवनाथ कांबळे, पांडुरंग वाली, बालासाहेब कुटे यांच्यासह शेकडो ज्येष्ठ, तरुण युवकांनी आदींनी प्रवेश केला. तसेच, शिरापूर गात येथील नवनाथ खरात, बाळू गाडे, नारायण कुंडरे, विठ्ठल कुंडरे, प्रल्हाद कुंडरे, हरिभाऊ कुंडरे, मधू खरात, विष्णू ढोरमारे, माऊली खंडागळे, पप्पू ढोरमारे, बाप्पासाहेब उबाळे, विठ्ठल गाडे, राम गाडे, अजय तावरे, राजू चव्हाण आदींनी प्रवेश केला.

## अपक्ष उमेदवार रमेशराव आडसकर यांची झंजावात सुरू ; गाव भेट दौऱ्यांना चांगला प्रतिसाद

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघात पंचरंगी लढत लागल्याने उमेदवारात चांगलीच ठस्सल पहिला मिळत आहे उमेदवार हे गावभेटी घेत मतदार राजाचा मतदान रुपी आशिर्वाद घेण्यासाठी ठिकठिकाणी गावात बैठकी व कार्यकर्ता मेळावा उमेदवारांनी आयोजित केलेले दिसत आहेत. याप्रमाणे माजलगाव मतदार संघाचे अपक्ष उमेदवार रमेशराव आडसकर यांनी प्रचाराला सुरुवात करून गावात बैठका घेत गॅस शेगडी या चिन्हासमोर बटन दाबून प्रचंड मताधिक्य द्या असे आडसकर हे मतदार राजाला साकडे घालत आहेत या वेळी आडसकर याचं वाडी, वस्ती, तंडा व गावा–गावात ठिकठिकाणी जंगी स्वागत करण्यात येत आहे.

मागच्या काही दिवसात अतिवृष्टीचे नुकसानात झालेल्या शेतकरी राजाला न्याय मिळवून देण्यासाठी चक्क शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन पाहणी करत संबंधित अधिकाऱ्याला पंचनामे करण्याचे आदेश आडसकर यांनी दिल्याने शेतकरी ही त्यांच्या कामाची कौतुक नेहमी करत असतो आडसकर हे विविध विकास कामाच्या माध्यमातून शेतकऱ्यासाठी धरणे आंदोलन असेल पीकविमा मिळून देण्यासाठी मोर्चा असेल तसेच २४ तास लाईट शेतकऱ्याला भेटाव म्हणुन महावितरण मोर्चा, निवेदन असेल अश्या विवीध कामात त्यांनी आवाज उठवला असल्याने जनतेचा सूर बदल हवा यंदा रमेश आडसकरच हवा च्या पोस्ट व चर्चा होत आहे त्यांनी केलेल्या कामाचा कौल मतदार मत पेटीतून देऊ शकतो



आडसकरांच्या झंझावात दौऱ्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आडसकर यांनी गोरगरिबाच्या शेगड्या ही पेटवल्याने त्यांच्यात नावाचा जयघोष मतदार राजाच्या दरबारात दिसत आहे.रमेश आडसकर यांचा मतदार संघात मोठा जनाधार आहे मतदारसंघांमध्ये त्यांनी मागच्या पाच वर्षापासून अनेक कामे केले असल्याने डोंगरपट्ट्यात मोठ्या प्रमाणात आडसकर यांना मानणारा वर्ग आहे.आडसकर समर्थकांमध्ये गुलाल आपल्याच लागणार अशी ही जोरदार चर्चा होत आहे विरोधकांना हाबाडा देणार असल्याचं बोललं जात आहे.सध्या तरी मतदार संघात आडसकर यांच्याच नावाने वारे वाहत आहे. मतदारसंघात अजून काही घडामोडी होणार का हे देखिल पाहणं तितकाच महत्त्वाच आहे.

# खोटे आश्वासने देऊन नाही तर विकासाच्या जोरावर मी पुन्हा मैदानात – आ.लक्ष्मण पवार

**तलवाड्याच्या त्वारितादेवीचे दर्शन घेऊन नारळ वाढवून आ.लक्ष्मण पवारांनी केला प्रचाराचा शुभारंभ**

गेवराई ।प्रतिनिधी

निवडणुकीच्या तोंडावर खोटे आश्वासने देऊन लोकांची दिशाभूल करत मतदारांच्या समोर हात पसरवणाऱ्यांना जनता ओळखून चुकली आहे. गेवराई मतदार संघात मागील १० वर्षात गाव–वाडी – वस्ती–तांड्यापर्यंत केलेली विकास कामे हीच आपली ताकद असून याच विकास कामाच्या जोरावर आपण पुन्हा एकदा विधानसभेच्या मैदानात उतरलो असल्याचे प्रतिपादन आ.लक्ष्मण पवार यांनी केले.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार आ. लक्ष्मण पवार यांनी तलवाडा येथील त्वरिता देवी मंदिर येथे जेष्ठांच्या हस्ते नारळ फोडून आपल्या प्रचाराचा शुभारंभ केला. यानंतर त्यांनी तलवाडा, राहेरी, भोगलगाव, गंगावाडी, आंतरवली यासह ठिकठिकाणी कॉर्नर सभा घेऊन मतदारांशी संवाद साधला




यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, विरोधक हे प्रत्येक निवडणुकीच्या तोंडावर मतदारांच्या दारात जाऊन खोटे आश्वासने देत मतदारांची दिशाभूल करून हात पसरवत आहेत. परंतु तालुक्यातील सर्व मतदार जनता हुशार असून ते विकासाच्या पाठीशी असल्याचे गेल्या दोन विधानसभा निवडणुकीत दिसून आले आहे. त्याच प्रमाणे गेल्या दहा वर्षांत केलेल्या विकास कामाची पावती म्हणून जनता या निवडणुकीतही आपल्या सोबत राहील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

एका लोकप्रतिनिधीने प्रामाणिकपणे काम केले तर मतदार संघाचा किती विकास होऊ शकतो हे आपण गेल्या दहा वर्षाच्या काळात दाखवून दिले आहे. मी दहा वर्षे आमदार होतो या काळात मला साडेसात वर्ष सत्ता काळातील मिळाली अन याच काळात आपण तळागाळातील जनतेसाठी होईल तेवढे प्रयत्न करून मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला म्हणून आज आपल्या गावगावच्या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. म्हणून गेल्या दहा वर्षात केलेली विकास कामे हीच आपली ओळख असून याच विकास कामाच्या जोरावर आपण पुन्हा एकदा अपक्ष उमेदवार म्हणून या विधानसभेच्या मैदानात उतरलो असून येत्या २० तारखेला सर्व मायबाप मतदार आपल्या ऑटोरिक्षा या चिन्हसमोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने मला विजयी करून हा विकास रथ असाच कायम पुढे चालू ठेवतील असा विश्वास आ.लक्ष्मण पवार यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

यावेळी मतलवाडा सर्कल मधील गंगावाडी, राहेरी, बोरगाव थडी, येथे भेटीगाठी दौरा सुरू केला.

यावेळी सुशील जंवजाळ, राजेंद्र राक्षसभुवनकर, जे.डी.शहा, भगवान घुबार्डे, दादासाहेब गिरी, राजेंद्र भंडारी, मधुकर वादे,शिनुभाऊ बेद्रे, सतिष दाभाडे, याहीया खॉन, शाम कुंड, सय्यद एजाज, देविदास फलके, शेख मोहम्मद, अभिजीत मरकड, अँड सुरेश पवार, काठोड्याचे सरपंच आबु कर्वे, रामेश्वर मस्के,शांलिदर बाबासाहेब कोरे, मतीन कुरेशी, भारत खटके, विष्णु गायकवाड, कृष्णा गायके, पुरूषोत्तम लाड,गोपाल लाड,अगद फलके, शेख मौहमद,राहुल बेडके,विलास तळेकर, अदिनाथ गर्जे, भास्कर गवते, गोरे मामा, यांच्यासह परिसरातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते, सरपंच, उपसरपंच, कार्यकर्ते तसेच मतदार बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# माजलगावात गुरूवारी मातंग समाज एकता मेळावा

**– मोटारसायकल रॅलीचे आयोजन**
**– समाजबांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा**
**– आयोजक अनिल राधे कांबळे यांचे आवाहन**

**माजलगाव ।प्रतिनिधी**

**शहरात मातंग समाजाची एकजुट करून वज्रमुठ आवळण्यासाठी मातंग समाज एकता मेळाव्याचे आयोजन दि. ७ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. यावेळी मोटारसायकल व कार रॅलीचे आयोजन देखिल करण्यात आले आहे. यामध्ये समाजबांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक तथा समाजसेवक अनिल राधे कांबळे यांनी केले आहे.**



शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात दि. ७ नोव्हेंबरला सकाळी १०.३० वाजता मातंग समाज एकता मेळावा होणार असुन त्यापूर्वी मोटारसायकल रॅली व कार रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीची सुरूवात ब्रम्हगाव येथील साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे चौकांपासुन ते शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकांपर्यंत काढण्यात येणार आहे. या मातंग समाज एकता मेळाव्यात आगामी विधानसभा निवडणुकीत समाजाची दिशा ठरविण्यासाठी व कोणत्या उमेदवारास पाठींबा द्यायचा याबाबत निर्णय घेण्यात येणार असुन समाजाचे विवीध प्रश्न, समस्यांबाबत देखिल चर्चा करण्यात येणार आहे. या रॅलीमध्ये व एकता मेळाव्यास समाजबांधवांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन उपसरपंच तथा समाजसेवक आयोजक अनिलराधे कांबळे यांनी केले आहे.

# लाडकी बहीण योजनेत २१०० रुपयांची वाढ; शेतकरी कर्जमाफी, अडीच लाख तरुणांना नोकऱ्या, यांसह अनेक महत्वपूर्ण घोषणा

**राष्ट्रवादी काँग्रेसकडून मतदारसंघनिहाय निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध ;जाहीरनाम्यात ११ नवीन आश्वासने समाविष्ट**
**अजित पवारांनी बारामतीतून, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी मुंबईतून तर धनंजय मुंडे यांनी परळीतून केला जाहीर...**
**परळीसाठी अजितदादांचा वादा, पंचतारांकित एमआयडीसी, वैद्यनाथ तीर्थक्षेत्राचा महाकालच्या धर्तीवर, जायकवाडीचे पाणी आणणे यांसह ५ प्रमुख वचने**

मुंबई ।प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी महाराष्ट्रातील लढवत असलेल्या विधानसभा मतदारसंघनिहाय निवडणूक जाहीरनामा (महाराष्ट्र घोषणापत्र) आज प्रसिद्ध केला असून या जाहीरनाम्यामध्ये अकरा नवीन आश्वासने समाविष्ट करण्यात आली आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस लढवत असलेल्या सर्व मतदारसंघात एकाचवेळी हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. बारामतीतून अजितदादा पवार, गोंदियामधून राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, नाशिकमधून ज्येष्ठ नेते मंत्री छगन भुजबळ, पक्षाचे प्रवक्ते तथा कृषिमंत्री धनंजय मुंडे परळीतून हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी होते.या जाहीरनाम्यामध्ये लाडकी बहीण योजनेची रक्कम २१०० रुपयांपर्यंत वाढवण्याचे जाहीर केले आहे. तर शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी करण्यात येणार आहे. शिवाय अडीच लाख नोकऱ्या आणि ग्रामीण भागात ४५ हजार पाणंद रस्त्यांचे बांधकाम करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

अजित पवार यांनी बारामती मतदारसंघातून बारामतीसाठी आणि पक्षाचा राज्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. राष्ट्रवादी काँग्रेसने पहिल्यांदाच लढवत असलेल्या मतदारसंघनिहाय पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी सरकार स्थापनेनंतर १०० दिवसात नवीन महाराष्ट्राचे व्हिजन जाहीर करु असे बारामतीतून माध्यमांशी



बोलताना स्पष्ट केले. तर परळीतून धनंजय मुंडे यांनी पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित करत दादांनी परळीला दिलेली ५ वचने प्रसिद्ध करण्यात आली.

याशिवाय प्रशिक्षणाद्वारे एक लाख विद्यार्थ्यांना दहा हजार मासिक स्टायपेंड देणार आहे. अंगणवाडी आणि आशा वर्कर कर्मचाऱ्यांना १५ हजार मासिक वेतन, सौर व अक्षय ऊर्जेला प्राधान्य देताना वीजबिल ३० टक्के कमी करण्यात येणार आहे. अत्यावश्यक वस्तूंच्या किमतीवर आळा, वृध्द पेंशन धारकांना महिन्याला २१०० रुपये अशी आश्वासनेही देण्यात आली आहेत. लाडकी बहीण योजना, ४४ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज, ५२ लाख कुटुंबांना तीन मोफत गॅस सिलेंडर, आर्थिक दुर्बल घटकातील मुलींना मोफत शिक्षणाचा समावेश, गरीब, मध्यमवर्गीय, युवक, महिलांच्या कल्याणासाठी... या जनतेच्या केंद्रस्थानी असलेल्या अनेक योजनांचा समावेश आहे. या योजनांना फार मोठा प्रतिसाद राज्यातील कानाकोपऱ्यातून मिळाला आहे. विशेष म्हणजे या सर्व योजना कुटुंब असेल किंवा युवक, महिला-भगिनींना आधार देण्याचा प्रयत्न केला आहे. या योजना जनतेच्या मनात खोलवर गेल्या आहेत असे सुनिल तटकरे यांनी यावेळी स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुमारे ३६ पानांचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला असून या जाहीरनाम्याच्या मुखपृष्ठावर महाराष्ट्रवादी घोषणापत्र असे छापण्यात आले आहे. शिवाय आपल्या मतदारसंघातील विकासकामे आणि घोषणापत्रांच्या माहितीसाठी ९८६१७१७१७१ हा हेल्पलाईन नंबर देण्यात आला आहे.

परळीला दादांचा वादा

दरम्यान परळी मतदारसंघात धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून पुढील काळात ५ प्रमुख कामे करण्याचा वादाच अजितदादांनी दिला आहे. यात प्रामुख्याने वैद्यनाथ तीर्थक्षेत्राचा उज्जैन महाकाल मंदिराच्या धर्तीवर सर्वांगीण विकास करणे, सिरसाळा येथे २२०० एकर जागेत पंचतारांकित एमआयडीसी कार्यान्वित करून उद्योगांना चालना देऊन मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणे, दूध संकलन केंद्र उभारणे, औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात संच क्रमांक ९ ची उभारणी करणे व जुन्या औष्णिक विद्युत केंद्रात सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे, जायकवाडीचे अडीच टीएमसी पाणी वाण धरणात तर एक टीएमसी पाणी तारुगव्हान येथे आणणे आणि परळी - बीड - नगर रेल्वे मार्ग जलद गतीने पूर्ण करून परळी वरून मोठ्या शहरांशी थेट कनेक्टिव्हिटी सुरू करणे ही ५ प्रमुख वचने अजित पवार यांनी जाहीर केले आहेत. तर धनंजय मुंडे हे अंबाजोगाई तालुक्यातील मुडेगाव येथील कॉर्नर बैठकीतून या जाहीरनामा प्रकाशन कार्यक्रमास ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते.

# खंडेरायांचा आशीर्वाद घेऊन बाबरी मुंडे यांनी ठोकला शड्डू

**प्रस्थापितांविरोधातील विस्थापितांच्या लढाईत साथ द्या - बाबरी मुंडे**

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांनी प्रचार शुभारंभाचा धूम धडाका लावला आहे. अपक्ष उमेदवार बाबरी मुंडे यांनी बुधवारी धारूर तालुक्यातील जागृत देवस्थान खंडोबा मंदिरात मल्हारी मार्तंडाचे आशीर्वाद घेत प्रचाराचे श्रीफळ वाढवून प्रचाराचा शड्डू ठोकला. लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचे स्वप्न साकार करण्यासाठी आपण मैदानात असून प्रस्थापितांविरोधातील या विस्थापितांच्या लढाईत मला साथ द्या असे भावनिक आवाहन बाबरी मुंडे यांनी केले. माजलगाव



विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार बाबरी उर्फ फुलचंद मुंडे यांनी श्रीक्षेत्र देवदहीफळ येथे निवडणूक प्रचाराचा शुभारंभ केला. विविध जाती धर्मातील नागरिकांनी प्रचार शुभारंभाला उपस्थिती लावली. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या सोबत गेल्या ३० ते ४० वर्षांपासून आम्ही राजकारणात सक्रिय आहोत. जनतेची सेवा करण्यासाठी मिळालेली ही संधी वाया जाऊ देऊ नका. सर्व मतदारांनी बाबरी मुंडे यांना भरघोस मताने विजयी करण्याचे आवाहन राजेभाऊ मुंडे यांनी केले.

प्रस्थापित उमेदवारांच्या विरोधात सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधी म्हणुन आपण ही निवडणूक लढवत आहोत. भविष्यात माजलगाव मतदार संघातील ऊसतोड मजूरांच्या कुटुंबासाठी भरघोस योजना, तरुणांसाठी रोजगार, नवनवीन उद्योगधंदे उभारण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे बाबरी मुंडे म्हणाले. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या स्वप्नातील विकास कामांना मूर्त स्वरूप देण्यासाठी मला विजयी करावे असे आवाहन बाबरी मुंडे यांनी उपस्थितीतांना केले.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती, उपसभापती, पंचक्रोशीतील सरपंच,उपसरपंच, नगरसेवक, ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन, पदाधिकारी,कार्यकर्ते,ग्रामस्थ आदी मान्यवर यांच्यासह माजलगाव विधानसभा मतदारसंघातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वंचित बहुजन आघाडीचा विधानसभा जाहीरनामा प्रसिद्ध

पुणे ।प्रतिनिधी

जोतिबा, शाहू, बाबासाहेब यांच्या विचारांनी प्रेरित जोशाबा समतापत्र - वंचित बहुजन आघाडीचा २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकी जाहीरनाम्याचे प्रकाशन नेते बाळासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते पुण्यात करण्यात आले. यावेळी राज्य उपाध्यक्ष दिशा पिंकी शेख व पुण्यातील वंचित बहुजन आघाडीचे विधानसभा निवडणुकीचे उमेदवार उपस्थित होते. जाहीरनामा पुढीलप्रमाणे

* धर्म धोक्यात नाही तर आरक्षण धोक्यात आहे!
* बोगस आदिवासींचे दाखले रद्द करू, हक्काच्या वन जमिनींचे वाटप करु
* जात जणगणना करून मंडल आयोगाची शंभर टक्के अंमलबजावनी करण्यात येईल
* ओबीसी आणि मराठा समाजाचे आरक्षणाचे ताट वेगळे ठेऊ.
* अंगणवाडी सेविकांना, आशा कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊ
* गायरान जमिनीवरील अतिक्रमण नियमित करू
* बौद्ध अनुयायांना मोफत धम्म सहल
* बेरोजगार सुशिक्षित तरुण तरुणींना २ वर्षापर्यंत ५ हजार रुपये वेटिंग पिरियड भत्ता देऊ



* ४० वर्षापेक्षा जास्त वयाच्या पारलिंगी व्यक्तींना ५ हजार रुपये मासिक पेंशन देऊ
* नवीन उद्योगांना अनुदान देऊ
* सर्वांना घऋते झऋ शिक्षण मोफत देणार
* प्रति महिना घरगुती वापराची २०० युनिट वीज मोफत व ३०० युनिट वीज ज्येष्ठ नागरिकांना मोफत देणार
* मोहम्मद पैगंबर बिल विधी मंडळात मंजूर करू
* महिलांना मिळणार मासिक ३५०० रुपये वेतन
* शेतमालाला हमीभाव देणारा कायदा करणार
* सोयाबीन व कापूस वेचणी करणाऱ्यांना मनरेगाकडून ५ रुपये प्रतिकिलो अनुदान देणार.

# आ.पवार काकांच्या प्रचारासाठी पुतण्या शिवराजने पिंजून काढले तांडे - वस्त्या

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार आमदार लक्ष्मण पवार यांच्या प्रचारासाठी पुतणे शिवराज पवार यांनी पाचेगाव गटातील तांडे - वस्त्या मंगळवारी पिंजून काढले. तांडे - वस्त्या च्या विकासाची गंगा सुरू ठेवण्यासाठी आमदार लक्ष्मण पवार यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे रहा असे आवाहन युवा नेते शिवराज पवार यांनी यावेळी केले. गेवराई विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार आमदार लक्ष्मण पवार यांच्या प्रचारासाठी युवा नेते शिवराज पवार यांनी मंगळवार दि. ५ रोजी पाचेगाव गटातील आहेर वाहेगाव, पाचेगाव, पवारवाडी, रेखा नाईक तांडा, जयराम तांडा, दामुनाईक तांडा, चाकू नाईक तांडा, वसंत नगर तांडा आदींसह पाचेगाव गटातील वाडी वस्त्या तांडे शिवराज पवार यांनी पिंजून काढले. डोअर टू डोअर जाऊन काका लक्ष्मण पवार यांनी गेवराई मतदारसंघात तांडे - वस्त्या च्या विकासासाठी केलेल्या



कामाची माहिती दिली. तांडे - वस्त्या च्या विकासासाठी आमदार लक्ष्मण पवार यांच्या टोरिक्षा चिन्हाचे बटण दाबून हात बळकट करा असे आवाहन शिवराज पवार यांनी पाचेगाव सर्कल संवाद दौऱ्या दरम्यान बोलतांना केले

यावेळी राहुल खंडागळे,लक्ष्मण चव्हाण,सरपंच रितेश साबळे, मधुकर यादव,प्रशोत्तम दाभाडे,गहिनीनाथ मते,रामभाऊ पवार, शेख ईसाक,विजय डरफे,दत्ता जाधव, प्रमेश्वर हाटोटे,सिध्दार्थ हाटोटे,अरुण हाटोटे,दादा खरसाडे,ओम घुळवे,मिटकरी,अशोक काळे,रामेश्वर हाटोटे,महादेव काळे,नुरभाई शेख,भय्या शेख,विकास राठोड,सुरेश लाखे,सुरेश हाटोटे,कृष्णा राठोड, बळीराम राठोड, संतोष राठोड, एकनाथ राठोड, शिवचरण जाधव, उत्तम चव्हाण, बबन राठोड, आकाश राठोड, प्रभु आडे,उत्तम राठोड, अर्जुन पवार,अविनाश राठोड, आदि उपस्थित होते

# वर्गमित्र दहावी २००७ बॅच विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न

किल्ले धारूर / प्रतिनिधि

धारूर शहरातील जनता प्रा. व मा.विद्यालयातील सन २००७ मधील दहावी वर्गमित्राचा स्नेहमेळावा श्री क्षेत्र अंबाचौंडी येथे संपन्न झाला असून त्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सीमा शिनगारे मॅडम या उपस्थीत होत्या,तसेच प्रमुख पाहुणे म्हणून महादेव शिनगारे सर, मंत्रे सर,शिंपले सर,गायके मॅडम, उज्वला मॅडम , मिठू सर व अशोक मामा हे कार्यक्रमाला उपस्थित होते.

सर्व शिक्षकांनी सर्वांना मार्गदर्शन केले याप्रसंगी महादेव शिनगारे सर यांनी मोबाईलचा होत असलेला अतिवापर व त्यामुळे होणारे बालमनावर होणारे परिणाम याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले त्यांनी दिलेली शिक्षणाची शिदोरी घेऊन विद्यार्थ्यांनी



आयुष्यात पुढे जावं खूप पुढे जावो लोकांना सांगताना मला अभिमान होतो की हा माझा विद्यार्थी आहे असे सांगताना आम्हाला खूप आनंद होतो. तसेच शिंपले सर, मंत्री सर, शिनगारे सर,उज्वला मॅडम यांनी सर्व त्यांच्या माजी विद्यार्थ्यांना बहुमूल्य असे मोलाचे मार्गदर्शन केलेले आहे.जुन्या आठवणींना उजाळा देत आज आपण तब्बल १७ वर्षांनी एकत्र आलोत याप्रसंगी जुने नवे अनुभव सांगताना सर्वांच्या डोळ्यांमध्ये आनंदाश्रू येत होते.

या स्नेह मेळाव्यासाठी आलेल्या सर्व मित्र मैत्रिणी यांनी आपआपले अनुभव शेअर केले याप्रसंगी खूप जणांनी त्यांच्या जीवनामध्ये बदल कसा झाला ते आज काय करतात ते उद्या काय करू इच्छिता याप्रसंगी सांगितले सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आणि शेवटी अध्यक्षीय समारोप हा सीमा मॅडम यांच्या मनोगताने झालेला आहे.सीमा मॅडम यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले होते की, खरंच की आमचे चेहरे तर तेच आहेत पण समोर बसलेल्या विद्यार्थ्यांमध्ये जे माझे विद्यार्थी होते त्यांचे चेहरे बदललेले आहेत खूप असा बदल झालेला आहे त्यामुळे जे मला माहित होते जे उन्नड होते तेच माझ्या लक्षात आहेत बाकी लक्षात नाहीत असे त्यांनी सांगितले म्हणजे ज्या ज्या गोष्टी त्यांनी शाळेमध्ये विद्यार्थ्यांमध्ये पहिल्या त्या गोष्टी आज येथे त्यांना दिसल्या नाहीत आज त्यांना एक सभ्य संस्कारी विद्यार्थी त्यांच्यासमोर दिसले खरंच खूप आनंद झाला असे त्यांनी सांगितले.या स्नेह मेळाव्यास सूत्रसंचालन ड.युवराज फुन्ने यांनी केले तर आभार प्रदर्शन माधुरी तिबोले हिने केले...

# विधानसभेत ५ वेळा पाडलेल्या बीडच्या पंडितांना आता कायमचे घरी बसवा - पंढरीनाथ लगड

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील जनता स्वाभिमानी आणि जागरूक आहेत. बीडच्या अमरसिंह पंडित, विजयसिंह पंडित यांनी शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य गोरगरिबांची नेहमीच अडवणूक करून छळले आहे. त्यामुळेच विधानसभेच्या झालेल्या ६ पैकी ५ निवडणुकीत गेवराईकरांनी त्यांना पाडले. आता या विधानसभा निवडणुकीत त्यांना राजकारणातून कायमचे घरी बसवा असे आवाहन माजी सभापती पंढरीनाथ लगड यांनी केले आहे.

महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार बदामराव पंडित यांनी गेवराई विधानसभा मतदारसंघात झंझावती दौरा केला असून, त्याला मतदार जोरदार प्रतिसाद देत आहेत. या दौऱ्यात त्यांच्यावर विश्वास ठेवून अनेक गावचे आणि तांड्यावरील कार्यकर्ते शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश करत आहेत. दिनांक ५ नोव्हेंबर २०२४ रोजी लोणाळा तांडा येथील सतीश राठोड यांच्यासह युवराज राठोड, अविनाश राठोड, मारुती राठोड, श्याम राठोड, बाळू जाधव, कृष्णा पवार, प्रशांत राठोड, श्रीराम जाधव, बाबा राठोड, बापूराव जाधव, सुनील राठोड, रोहिदास राठोड, पंडित राठोड, सद्गुण राठोड, योगेश राठोड शिवाजीराव राठोड, संजय जाधव, भैय्या जाधव,शरद जाधव, नितीन राठोड, साईनाथ राठोड, राहुल जाधव, नीलम राठोड, किरण राठोड, चंद्रकांत राठोड, कल्याण चव्हाण, भगवान राठोड, अंकुश राठोड आदींसह असंख्य बंजारा समाज बांधवांनी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि शिवसेना जिल्हा सहसंपर्कप्रमुख माजी आमदार सुनील धांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी जिल्हा परिषदचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजीत पंडित, माजी शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बेदरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड, माजी सभापती पंढरीनाथ लगड, शिवसेना उपजिल्हाप्रमुख महादेव औटी, युवानेते यशराज पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना पंढरीनाथ लगड म्हणाले



की, गेल्या ३० वर्षात विधानसभेच्या सहा निवडणुका झाल्या आहेत या निवडणुकीत बदामराव पंडित हे सातत्याने निवडणुकीला सामोरे जात असून, त्यांच्या प्रामाणिक कामावर विश्वास ठेवून जनतेने त्यांना तीन वेळा आमदार आमदार केले. मात्र त्यांच्या विरोधात माजी राज्यमंत्री शिवाजीराव दादा पंडित माजी आमदार अमरसिंह पंडित आणि जिल्हा परिषद चे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित हे एकाच कुटुंबातले तिघेजण निवडणूक लढत आहेत. कार्यकर्त्यांची फोडाफोडी आणि नोकरी आणि कामाचे आम्हीच दाखवून मतदान घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या या बीडच्या पंडितांना गेवराईच्या स्वाभिमानी जनतेने विधानसभेच्या झालेल्या सहा पैकी पाच निवडणुकीत पाडले आहे. तरीही हे गोरगरिबांना त्रास देणे सोडत नाहीत आता यांना राजकारणातून कायमचे हद्दपार करून बीडला पाठवा असे आवाहन लगड यांनी केले. याप्रसंगी कैलास राठोड, शिवाजी राठोड, सय्यद सिराज, विकास राठोड, विजय राठोड यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकं वृक्ष संवर्धनाऐवजी वृक्षांचे उच्चाटन करू लागले!

## आपणच आपल्या ऱ्हासास कारणीभूत ठरू – एस.एम.युसूफ़

बीड ।प्रतिनिधी

आता लोकंच वृक्ष संवर्धनाऐवजी वृक्षांचे उच्चाटन करू लागल्याचे मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी व्यक्त केले असून अशीच अवस्था राहिली तर आपणच आपल्या ऱ्हासास कारणीभूत ठरू असे उद्विग्न मत ही व्यक्त केले आहे. याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड शहरात असलेल्या न्यू सुंदर मेडिकल ते थोरातवाडी आणि जुने एस.पी. ऑफिस ते जिल्हा रुग्णालय रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी झाडे लावण्याकरिता चला थोडंसं वाचूया या व्हाट्सअप ग्रुप ने जून चा पूर्ण महिना ग्रुपमध्ये जनजागृती करून वृक्षारोपणासाठी ६ हजार रुपयांची रक्कम जमा केली. त्यातून जुलै महिन्यात १३ कडंबाची तर ३ गुलमोहराची ८ ते १२ फूट उंचीची एकूण १५ झाडे या दोन्ही रस्त्यांच्या दुतर्फा लावली. ही १५ ही झाडे लावल्यानंतर आतापर्यंत चांगली वाढत आहे. असे असताना काही नतदृष्टांची नजर या झाडांना लागली. १५ पैकी २ गुलमोहराची तर ३ कडंबाची झाडे अज्ञातांनी तोडली आहे. येथे लक्षात घेण्यासारखी



गोष्ट म्हणजे कडंब आणि गुलमोहर ही दोन्ही झाडे गाय, म्हैस, बैल, शेळ्या, मेंढ्या यापैकी कोणतेही जनावर खाणे तर दूर या झाडांजवळ जात सुद्धा नाही. यामुळेच येथे कडंब आणि गुलमोहरांची झाडे लावली होती. परंतु ज्या झाडांना जनावर इजा पोहोचवीत नाही, त्याचा पाला किंवा साल खात नाही, अशा कडंब आणि गुलमोहराच्या झाडांपैकी ३ कडंबांची तर २ गुलमोहराची झाडे काही नतदृष्टांनी तोडून टाकली आहे. आता उर्वरित १० झाडांच्या सुरक्षेसाठी सुरक्षित जाळ्या लावण्याएवढे आर्थिक पाठबळ चला थोडंसं वाचूया या व्हाट्सअप ग्रुप कडे नाही. आणि जनावरांऐवजी लोकंच अशा प्रकारे वृक्षारोपण केलेली झाडे तोडू लागले, वृक्ष संवर्धनाऐवजी वृक्षांचे उच्चाटन करू लागले तर आपणच आपल्या ऱ्हासास कारणीभूत ठरू असे उद्विग्न मत या दोन्ही रस्त्यांवर झाडे लावण्यासाठी चला थोडंसं वाचू या या व्हाट्सअप ग्रुप च्या माध्यमातून पुढाकार घेतलेले ग्रुप डमिन तथा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.

# केज मतदारसंघात आ. नमिता मुंदडा यांचाच बोलबाला !

## आ. नमिता मुंदडा यांनी प्रचारात घेतली आघाडी

केज ।प्रतिनिधी

केज मतदारसंघात जस जशी निवडणूक मतदानाची तारीख जवळ येत आहे.तस-तशी भाजपा महायुतीच्या उमेदवार आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी प्रचारात जोरदार आघाडी घेतली आहे. सध्या केज मतदारसंघात फक्त आ. नमिता मुंदडांचाच बोलबाला दिसून येत आहे. सोमवार, दिनांक ४ नोव्हेंबर रोजी आ. मुंदडा यांनी केज मतदारसंघातील प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने केज तालुक्यातील बनसारोळा, इस्थळ, सौंदना, औरंगपूर, आवसगांव या गावांना भेट दिली. तसेच या प्रचारफेरी दरम्यान आगामी विधानसभा निवडणुकीत मला मतदानरूपी आशीर्वाद



द्यावेत, अशी मतदार बंधू भगिनींना विनंती केली. लोकांशी असलेला सातत्यपूर्ण जनसंपर्क, संवाद आणि विकास कामांसाठी आणलेल्या भरघोस निधीमुळे, झालेल्या अनेक विकास कामांमुळे आणि महिलांसाठी राबविलेल्या लाडकी बहिण योजनेच्या प्रभावी अंमल बजावणी मुळे व वयोवृद्धांसाठी तिर्थक्षेत्र योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे भाजप महायुतीच्या उमेदवार आमदार नमिता मुंदडा या जनतेच्या मनात आपुलकी, आपलेपणा निर्माण करण्यात यशस्वी झाल्या आहेत. तसेच त्यांचा सोज्वळ स्वभाव व जनतेचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर तात्काळ तोडगा काढून सांगितलेले काम मार्गी लावण्याच्या तत्परतेमुळे आ. नमिता मुंदडा यांनी मतदानाआधीच इतर उमेदवारांना केज मतदारसंघातून खुप मागे टाकले आहे. समाजसेवक तसेच भाजपचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा (काकाजी) यांच्या मार्गदर्शनाखाली व युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली भाजप महायुतीचे नेते, कार्यकर्ते देखील मोठ्या प्रमाणात त्यांच्या प्रचारासाठी कामाला लागले आहेत. आमदार पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांची भक्कम साथ यामुळे महायुतीच्या अधिकृत उमेदवार आ. नमिता अक्षय मुंदडा यांचाच केज मतदारसंघात बोलबाला निर्माण झाला असून त्यांचा विजय जवळपास निश्चित झाला आहे. अशी चर्चा मतदारसंघात सर्वत्र ऐकायला मिळत आहे. केज मतदारसंघात जस - जशी निवडणूक मतदानाची तारीख जवळ येत आहे तस-तशी भाजपा महायुतीच्या उमेदवार आ. नमिता अक्षय मुंदडा

# अजित दादा आणि धनंजय मुंडे सत्तेत आहे तोपर्यंत अल्पसंख्यांक समाजाच्या केसालाही धक्का लागणार नाही

## आ. ईद्रस नायकवडी यांनी केला व्यक्त विश्वास

परळी ।बापू किरवले

अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस इतर दोन पक्ष सोबत सत्तेत गेला म्हणून आपल्या समाजाची दिशाभूल केली जात आहे मुळात अल्पसंख्यांक समाजाचे प्रश्न सोडवण्याची धमक आणि काम करण्याच्या करण्याचा अनेक इरादा हा अजित दादा पवार मध्ये आहे हे विरोधकांना सुद्धा माहित आहे म्हणूनच मागच्या अर्थसंकल्प मौलाना आझाद आर्थिक विकास मंडळाचे बजेट तीस कोटी वरून वाढवून अजितदादांनी ७०० कोटीवर नेऊन दाखवले हे सत्य समाजाला समजले पाहिजे असे मत राष्ट्रवादी अल्पसंख्यांक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष तथा विधान परिषद सदस्य आमदार ऍंड्रेस नायकवडी यांनी परळी येथील मेळघास बोलताना व्यक्त केले आहे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रचारार्थ परळी शहरातील व्हीआयपी फॅशन हॉल येथे आमदार ।ङ्गि नायकवडी यांच्या प्रमुख उपस्थितीत अल्पसंख्याक समाजाच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या मिळाल्यास परळी शहरासह तालुक्यातील मुस्लिम समाज बांधव पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित दादा पवार तसेच धनंजय मुंडे साहेब यांच्या नेतृत्वात काम करत असताना विशाल गडाच्या घटनेपासून ते मेरा भाईंदरच्या घटनेपर्यंत दादरच्या दादाच्या कामाची तात्परता आणि पाहिली आहे अल्पसंख्यांक समाजासाठी कायम धावून घेण्याचा त्यांचा स्वभाव आहे त्यामुळे लोकसभेत काय घडले याचा विचार न करता आता विधानसभा निवडणूक मात्र





समाज बांधवांनी संपूर्ण धनंजय मुंडे सारख्या नेत्याच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे असे श्री नाईक कवाडे पुढे बोलताना म्हणाले आदरणीय अजित दादा धनंजय मुंडे साहेब यांच्या पुढाकारातून पार्टीच्या धरतीवर भारती सरकारने म्हणाले तर आपल्या कायमस्वरूपी धनंजय मुंडे आणि अजित दादा पवार यांच्या पाठीशी उभे राहावे लागेल असा निर्धार य व्यक्त केला उभारणे त्याच्याबरोबर शहरातील चारी कबरस्तांचेकरण करून त्या ठिकाणी चार प्रार्थना हॉल उभारणे त्याबरोबर शहरातील चारही कब्रस्तानच्या सुदीकरण करून त्या ठिकाणी संकल्प धनंजय मुंडे यांनी केला असून आगामी काळात ते कामे पूर्ण केली जातील असा विश्वास यावेळी प्रस्तावित पर भाषणामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी व्यक्त केला या योजना राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष वैजनाथराव सोळंके शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी भाई पठाण शकील कुरेशी अजित कच्ची राजा खान जाफर खान तशी खान अनमोल मिस्कील इस्माईल पटेल रमेश अण्णा टाक शरद भाऊ मुंडे हाजी बाबा अल्ताफ पठाण एजाज शेख शेख निसार हुसेन सेवादालचे लाल पठाण केडी उपाडे दत्ताभाऊ सावंत सय्यद मिराज आसिफ आणि शिराज अहमदनगर शकील काचे यांच्यासह अनेक मान्यवर पदे पदाधिकारी अधिक उपस्थित होते .

# द्रोपदा बाई पवार यांचे दुःखद निधन



आष्टी ।प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील अंतापुर येथील ग्रामपंचायत शिपाई नाना पवार यांच्या मातोश्री द्रुपदा भाई रावसाहेब पवार यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंतापूर येथे अंत्यविधी करण्यात आला त्यांच्या पाठीमागे एक मुलगा व मुलगी इंदू कांबळे सविता साबळे सिंधू कांबळे असून त्या पत्रकार सुरेश कांबळे यांच्या सासु होत्या त्यांचा स्वभाव मनमिळावू प्रेमळ होता त्यांच्या जाण्याने गावात हळूहळू व्यक्त करण्यात येत आहेत्यांचा दशक्रिया विधी १३ /११/ २०२४ रोजी निंबोडी येथे होणार आहे



# जेष्ठ पत्रकार दिलिप बद्दर यांच्या कुटुंबियांचे सौ.सुदामतीताई गुट्टेंकडुन सात्वन

परळी ।प्रतिनिधी

जेष्ठ पत्रकार दिलिप बद्दर यांच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबियांचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांनी सांत्वन केले. दै.सामना व दै.लोकाशाचे परळी प्रतिनिधी दिलिप बद्दर यांचे नुकतेच दुःखद निधन झाले असुन यामुळे बद्दर परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.दिलिप भाऊ बद्दर यांनी आपल्या पत्रकारीतेच्या माध्यमातून अनेकांना न्याय मिळवून दिला.लोकहितासाठी त्यांनी आपली लेखणी चालवली अश्या पत्रकाराला आज आपण मुखलो आहोत या शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसच्या जेष्ठनेत्यासौ.सुदामतीताई गुट्टे यांनी शोकभावन व्यक्त करत बद्दर कुटुंबाचे सांत्वन केले.

# अजितदादांनी ३० कोटींचे मौलाना आझाद महामंडळ ७०० कोटींवर नेले – आ.इद्रिस नायकवडी

## अजितदादा आणि धनंजय मुंडे सत्तेत आहेत तोपर्यंत अल्पसंख्यांक समाजाच्या केसालाही धक्का लागणार नाही – आ.नायकवडी यांनी व्यक्त केला विश्वास

परळी / प्रतिनिधी

अजित दादा पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष इतर दोन पक्षांसोबत सत्तेत गेला म्हणून आपल्या समाजाची दिशाभूल केली जात आहे. मुळात अल्पसंख्यांक समाजाचे प्रश्न सोडवण्याची धमक आणि काम करण्याचा नेक इरादा हा अजितदादा पवारांमध्ये आहे हे विरोधकांना सुद्धा माहित आहे. म्हणूनच मागच्या अर्थसंकल्पात मोलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे बजेट तीस कोटींवरून वाढवून अजितदादांनी ७०० कोटींवर नेऊन दाखवले हे सत्य समाजाला समजले पाहिजे, असे मत राष्ट्रवादी अल्पसंख्यांक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष तथा विधानपरिषद सदस्य आ.इद्रिस नायकवडी यांनी परळी येथील मेळाव्यात बोलताना व्यक्त केले आहे.

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रचारार्थ परळी शहरातील व्हीआयपी फंक्शन हॉल येथे आ.इद्रिस नायकवडी यांच्या प्रमुख उपस्थितीत अल्पसंख्यांक समाजाच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास परळी शहरासह तालुक्यातील मुस्लिम समाज बांधव, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित दादा पवार तसेच धनंजय मुंडे साहेब यांच्या नेतृत्वात आम्ही काम करत असताना विशाल गडाच्या घटनेपासून ते मीरा भाईंदरच्या घटनेपर्यंत दादांच्या कामाची तत्परता आम्ही पाहिली आहे अल्पसंख्यांक समाजासाठी कायम धावून येण्याचा त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळे लोकसभेत काय घडले याचा विचार न करता आता विधानसभा निवडणुकीत मात्र समाज बांधवांनी संपूर्णपणे धनंजय मुंडे सारख्या नेत्यांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे असेही



श्री नाईकवाडी पुढे बोलताना म्हणाले.

आदरणीय अजित दादा व धनंजय मुंडे साहेब यांच्या पुढाकारातूनच पार्टीच्या धरतीवर मार्टि साकारले, मराठी या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून मुस्लिम समाजातील गरीब कुटुंबातील अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून अभ्यास करणाऱ्या मुलांना प्रचंड मोठा लाभ होणार आहे या प्रकारचे निर्णय व्हायचे असतील तर आपल्याला कायमस्वरूपी धनंजय मुंडे आणि अजित दादा पवार यांच्या पाठीशी उभे राहावे लागेल असाही निर्धार यावेळी त्यांनी व्यक्त केला.

समाजाच्या विकासासाठी विविध ठिकाणी शादीखाने, तसेच रस्ते, पाणी यांसारख्या विविध योजना आणि घरकुलांच्या माध्यमातून धनंजय मुंडे यांनी नेहमीच समाजासाठी प्राधान्याने काम केलेले आहे. आगामी काळात शहरांमध्ये एक भव्य शादीखाना व महिलांसाठी स्वतंत्र हॉल उभारणे त्याचबरोबर शहरातील चारही कब्रस्तानांचे सुशोभीकरण करून त्या ठिकाणी चार प्रार्थना हॉल उभारण्याचा संकल्प धनंजय मुंडे यांनी केला असून आगामी काळात तेही कामे पूर्ण केली जातील, असा विश्वास यावेळी प्रास्ताविकपर भाषणामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी व्यक्त केला. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, अयुब भाई पठाण, शकील कुरेशी, अजित कच्छी, राजा खान, जाफर खान, तकी खान, अन्वर मिस्कीन, इस्माईल पटेल, सुरेश आण्णा टाक, शरद भाऊ मुंडे, हाजी बाबा, अल्ताफ पठाण, एजाज शेख, शेख नाझीर हुसेन, सेवादल चे लाला पठाण, के डी उपाडे, दत्ताभाऊ सावंत, सय्यद सिराज आसिफ अली, सिराज अहमद, गफार काकर, जमील अध्यक्ष, शकील कच्छी यांसह अनेक मान्यवर पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# मोहनराव जगताप यांना ग्रामीण भागात चांगला प्रतिसाद

## ग्रामीण युवकांनी घेतली जगताप यांची निवडणूक हातात

माजलगाव : प्रतिनिधी

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार मोहनराव जगताप यांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात त्यांच्या दौऱ्यांना चांगला प्रतिसाद भेटत असून ग्रामीण भागातील युवकांनी मोहनराव जगताप यांची निवडणूक हातात घेतली आसल्याचे चित्र आज पाहण्यास मिळत आहे. किट्टीआडगाव व सादोळा पंचायत समिती सर्कल मधून युवकांनी त्यांच्या दौऱ्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत त्यांच्या विजयावर शिक्का मोर्तब केले.

आज मनूर, देवीचे मनूर, केसापुरी,



आबूजवाडी, मालीपारगाव, सादोळा, महातपुरी जायकवाडी, गोविंदवाडी, रामनगर वस्ती, पुरुषोत्तमपुरी, माळेवाडी वाघोरा शहाजनपुर, किट्टी आडगाव, पायतलवाडी, सिद्धेश्वरनगर आदी गावापैकी बहुतांश गावात मोहनराव जगताप यांची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. शिवाय युवकांनी ही निवडणूक हातात घेतल्याची सांगत विजयाची ग्वाही दिली.अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद युवक वर्गातून जगताप यांना मिळत आहे.

यावेळी मोहनराव जगताप यांच्या सोबत काँग्रेस तालुकाध्यक्ष नारायणराव होके,डॉ श्रीराम खलगे,अशोक किर्जत,नरवडे साहेब, उद्धवराव धुमाळ, राहुल काका जगताप, बबन थावरा पवार, श्रीकृष्ण सोळंके, भालचंद्र सोळंके अविनाश गोंडे, गणेश रांजवण,संतोष यादव



**माजलगाव : (प्रतिनिधी) पं.समिती माजलगाव येथे ग्रामविकास अधिकारी पदी निवड झाल्याबद्दल झक्कु सादोळा चे केंद्रप्रमुख डॉ. पारगावकर साहेब यांनी ओंकार सोळंके व झडख नेहा सोळंके निकम यांचा सत्कार केला व कौतुक केले प्रसंगी प्रल्हाद नाना सोळंके,उगले साहेब, अरोग्य केंद्रांचे कर्मचारी उपस्थित होते.**

## बाजार सावंगी पोलिसांची धडाकेबाज कारवाई
## धामणगाव मध्ये गावठी दारूचा अड्डा केला पूर्ण उध्वस्त



प्रतिनिधी। धामणगाव

येथे दारू अड्डयावर तयार करण्यात येणाऱ्या गावठी दारूच्या अड्ड्यावर धाड टाकण्यात येऊन बाराशे लिटर रसायन व तयार केलेली गावरान दारू मंगळवार (ता५) दुपारी ११ ते तीन च्या वेळेत बाजार सावंगी पोलीस चौकीच्या पथकाने ऐनवेळी धाड टाकून प्रत्यक्षात घरामागील बनवण्यात येणाऱ्या गावठी दारूचा अड्डा पूर्ण उध्वस्त केला

पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांना गुप्तहेर मार्फत तालुक्यातील धामणगाव येथे गावठी दारू तयार होत असल्याची खबर मिळाल्यावरून बाजार सावंगी च्या पोलीस चौकीतील पथकाला आदेश मिळाल्याने जमादार संजय सपकाळ विनोद बिघोत दिलीप बनसोड संतोष पुंड व अन्य जमादार यांनी मिळालेल्या माहितीनुसार धामणगाव येथे धाड टाकली व कारवाई केली या पथकाने दुपारी गावात इतरांना माहिती करून देता गुप्त रीतीने ठिकाणाचा शोध घेतला त्यावरून धामणगाव येथील गावठी दारू तयार करणाऱ्या तीनही महिला असल्याचे निदर्शनास आले व त्यांच्या घरांची झडती घेतली असता घरांच्या पाठीमागील मोकळ्या जागेत हा व्यवसाय करण्यात येत होता

प्लॅस्टिक टाक्या व चुल यांचा घरामागे शोध घेतला असता तेथील महिला जिजाबाई गायकवाड सोनुबाई सोनवणे नबा बाई गायकवाड यांच्या घरांच्या पाठीमागील मोकळ्या जागेत हा व्यवसाय सुरू असल्याचे तपासात दिसून आले त्या ठिकाणी कार्यवाही पोलिसांनी केली असता गावठी दारू रसायन चूल बट्टी दिसून आली असता ती जप्त करण्याची कार्यवाही केली व नष्ट केले तीनही महिला उद्योजक असल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल होऊन कार्यवाही करण्यात आली

## राष्ट्रीय पक्ष बहुजन समाज पार्टीला माजलगाव निवडणूक आयोगाकडून दुय्यम स्थान मुख्य निवडणूक आयोगाकडे
# डॉ. सिद्धार्थ टाकणखार यांनी केली तक्रार

माजलगाव : प्रतिनिधी

माजलगाव मतदार संघ क्रमांक २२९ मध्ये राष्ट्रीय पक्ष म्हणून गणल्या जाणाऱ्या बहुजन समाज पार्टी साठी माजलगाव निवडणूक निर्णय अधिकार्याने दुय्यम दर्जाची वागणूक दिली असल्याची तक्रार मुख्य निवडणूक आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रदेश सचिव तथा झोन प्रभारी व माजलगाव विधानसभेचे उमेदवार डॉ सिद्धार्थ टाकणखार यांनी केले आहे

निवेदनात पुढे म्हटले आहे की राष्ट्रीय पक्ष हा वोटर मशीन मध्ये क्रमांक एक ला यायला हवा मात्र माजलगाव निवडणूक अधिकारी यांनी राजकीय पुढाऱ्यांच्या दबावाला बळी पडत राष्ट्रीय पक्ष असणाऱ्या बहुजन समाज पार्टीवर एक प्रकारे अन्याय केलेला आहे माजलगाव




मध्ये प्रादेशिक पक्ष असणारे आमदार प्रकाश सोळंके यांना एक नंबरचे स्थान देण्यात आलेले आहे यामुळे माजलगाव तालुका निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय कुणाच्या आदेशाने आहे याबाबत सर्वत्र चर्चा केली जात आहे

बहुजन समाज पार्टी हा राष्ट्रीय पक्ष असतानाही चौथ्या क्रमांकावर कसा ? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेतून व्यक्त केला जात आहे निवडणूक आयोग हा कोणत्याही एका पक्षाचा बटिक नसतो व राष्ट्रीय पक्ष प्रथम क्रमांकावर असतात प्रादेशिक पक्ष द्वितीय क्रमांक वर असतात तर रजिस्टर पक्ष तिसऱ्या स्थानी असतात मात्र महाराष्ट्रामध्ये तशी परिस्थिती दिसून येत नाही माजलगाव तालुका निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या आले मना तेथे कुणाचेच चालेना अशी परिस्थिती दिसून आली आहे यामुळे महाराष्ट्रातील लोकशाही आहे की हुकूमशाही असा प्रश्न निर्माण होत आहे. प्रत्येक तालुक्यात जर असाच अन्याय झालेला असेल तर लवकरच मुख्य निवडणूक आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्या जिल्हा निवडणूक अधिकारी, तालुका निवडणूक निर्णय अधिकारी या सर्वांना सर्व राष्ट्रीय पक्षाच्या वतीने न्यायालयात घेतले जाणार असल्याचे बहुजन समाज पार्टीचे उमेदवार डॉ सिद्धार्थ टाकणखार यांनी मुख्य निवडणूक आयुक्त महाराष्ट्र राज्य यांना दिलेल्या निवेदनातून कळविले आहे.

# मोहनराव जगताप यांना ग्रामीण भागात चांगला प्रतिसाद



**ग्रामीण युवकांनी घेतली जगताप यांची निवडणूक हातात**

**माजलगाव (प्रतिनिधी)**

**राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार मोहनराव जगताप यांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात त्यांच्या दौऱ्यांना चांगला प्रतिसाद भेटत असून ग्रामीण भागातील युवकांनी मोहनराव जगताप यांची निवडणूक हातात घेतली आसल्याचे चित्र आज पाहण्यास मिळत आहे. किट्टीआडगाव व सादोळा पंचायत समिती सर्कल मधून युवकांनी त्यांच्या दौऱ्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत त्यांच्या विजयावर शिक्का मोर्तब केले.**

आज मनूर, देवीचे मनूर, केसापुरी, आबूजवाडी, मालीपारगाव, सादोळा, महातपुरी जायकवाडी, गोविंदवाडी, रामनगर वस्ती, पुरुषोत्तमपुरी, माळेवाडी वाघोरा शहाजनपुर, किट्टी आडगाव, पायतलवाडी, सिद्धेश्वरनगर आदी गावापैकी बहुतांश गावात मोहनराव जगताप यांची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. शिवाय युवकांनी ही निवडणूक हातात घेतल्याची सांगत विजयाची ग्वाही दिली.अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद युवक वर्गातून जगताप यांना मिळत आहे.

यावेळी मोहनराव जगताप यांच्या सोबत काँग्रेस तालुकाध्यक्ष नारायणराव होके,डॉ श्रीराम खळगे,अशोक किर्जत,नरवडे , उद्धवराव धुमाळ, राहुल जगताप, बबन थावरा पवार, श्रीकृष्ण सोळंके, भालचंद्र सोळंके अविनाश गोंडे, गणेश रांजवण,संतोष यादव, शरद यादव, ईश्वर होके, प्रवीण तिडके, गोविंद इटापे, सरपंच अंगत कटके प्रकाश चव्हाण सह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुरुषोत्तमाच्या चरणी नारळ फोडुन आ. सोळंकेंच्या प्रचाराचा शुभारंभ

## महायुतीच्या सोळंकेंच्या विजयासाठी पुरूषोत्तमपुरी सर्कल सरसावले

माजलगाव ।प्रतिनिधी

महायुतीचे उमेदवार आ. प्रकाश सोळंके यांच्या प्रचाराचा शुभारंभ आज दि. ५ नोव्हेंबर २०२४ रोजी देशातील एकमेव असलेल्या भगवान पुरूषोत्तमाच्या चरणी नारळ वाढवुन करण्यात आला तर यावेळी पुरूषोत्तमपुरी परिसरातील पंधरा ते विस गावातील ग्रामस्थांनी आ. सोळंके यांच्या विजयाचा निर्धार व्यक्त केला.

बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे यांच्या शेतात आयोजित करण्यात आलेल्या सादोळा, किट्टीआडगाव पंचायत समिती गण मेळाव्यात बोलतांना आ. सोळंके यांनी सांगीतले की, भगवान पुरूषोत्तमाचे देशामध्ये एकमेव असे प्राचीन मंदिर आहे. या मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी व विकासाकामांसाठी ५५ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच या भागातील शेतक-यांसाठी वरदान ठरलेल्या लोणी सावंगी उच्चपातळी बंधारा, तसेच नुकताच शुभारंभ झालेला सुर्डी - सादोळा या रस्त्यासह या भागातील प्रत्येक गावातील प्रमुख रस्ते विवीध योजने अंतर्गत पाणंद रस्ते आदी विकासाची कामे पुर्णत्वास नेण्यासाठी कायम प्रयत्न केले आहेत. यावेळी मा. सभापती जयसिंग सोळंके, अच्युतराव लाटे, शिवाजी रांजवण, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, भाजपा तालुकाध्यक्ष अरूण राउत, रविकांत राठोड, उपजिल्हाप्रमुख नितीन मुंदडा, बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, संभाजी शेजुळ, आझाद क्रांती सेनाप्रमुख राजेश घोडे, अमोल शेरकर, सरपंच अजय शिंदे, भागवत शेजुळ, शहाजी कोलते, छबन जाधव यांची उपस्थिती होती.



..अन् आ. सोळंकेंना अश्रु अनावर झाले

आज कै. लोकनेते सुंदरराव सोळंके यांची पुण्यतिथी असुन माजलगाव मतदारसंघाच्या विकासासाठी व माझ्या जडणघडणीसाठी साहेबांचा मोठा वाटा होता. आज त्यांच्या विचारांची प्रेरणा घेवुनच यशस्वी मार्गक्रमण करत आहे तर पुण्यतिथी असुन आज त्यांच्या आशिर्वादाच्या जोरावर विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडला आहे. तसेच माझ्या घरावर मागील वर्षी दुर्देवी हल्ला झाला. मी घरात असतांना माझ्या घराला आग लावली. यामध्ये मोठे नुकसान तर झालेच परंतु मतदारसंघातील जनतेच्या आशिर्वादामुळे वाचलो आणि या दुर्देवी

घटनेबाबत पोलिस ठाण्यात तक्रार दिलेली नाही तसेच कोणत्याही व्यक्तीचे नाव घेतले नाही परंतु विरोधक माझेच घर जळाले असतांना माझी बदनामी करण्याचे षडयंत्र करत असल्याचे सांगतांना आ. सोळंके यांना आश्रु अनावर झाले.

## लाडक्या बहिणींसाठी १०० वेळा तुरुंगात जायला तयार; मुख्यमंत्री शिंदेंचा विरोधकांवर नेत्यांवर पलटवार

सातरा : महायुती सरकारने राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण (डरवङ्गळ लरहळप ्क्षरपर) योजना सुरू केली. या योजनेच्या माध्यमातून अडीच कोटी महिला भगिनींना थेट लाभ मिळाला आहे. लाडक्या बहिणींना सक्षम करण्यासाठी आम्ही ही योजना सुरू केली आहे, मात्र या योजनेला विरोध करण्यासाठी काही मंडळी कोर्टात गेली आहेत.

त्यामुळे तुमच्या योजनेत खोडा घालणाऱ्यांना आपण कोल्हापरी जोडा नक्की दाखवाल असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला. या भागाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी महायुती कटिबद्ध असून त्यासाठी कधीही निधीची कमतरता जाणवू देणार नाही अशी ग्वाही देखील प्रचारसभांमध्ये दिली. जन्मभूमीत कार्यक्रम असतो तेव्हा तो आनंद वेगळा असतो, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी सातारा जिल्ह्यातील पाटण विधानसभा मतदारसंघात मंत्री आणि शिवसेना उमेदवार शंभूराजे देसाई यांच्या प्रचाराचा नारळ फोडला. याप्रसंगी लाडकी बहीण योजनेसाठी किंवा सर्वसामान्यांसाठी मी १०० वेळा तुरुंगात जायला तयार असल्याचंही त्यांनी म्हटलं.


कोविड होता तेव्हा शंभूराजे वणवण फिरला, दरड कोसळली कि तो वणवण फिरला. शंभूराजे यांनी २९०० कोटी रुपये निधी आणण्याचे काम मतदारसंघासाठी केलं आहे. गेल्या अडीच वर्षात हे आमदार वणवण फिरत होते, आम्हाला निधी द्या. पण, पूर्वीचे सरकार हे बहिरे होते, घरात बसून फेसबुक लाईव्ह करून सरकार चालत नसते, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला. त्यानंतर, लाडकी बहीण योजनेची माहिती देत आपण तुरुंगातही जायला तयार असल्याचं म्हटलं. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे महिलांना आर्थिक स्वातंत्र्य व पाठबळ मिळाले, महिला भगिनींना घरात मान सन्मान मिळू लागला. आता हीच योजना बंद करण्याचा चंग महाविकास आघाडीवाल्यांनी बांधला आहे. पण कुणीही कितीही प्रयत्न केले तरीही ही योजना बंद पडू देणार नाही,

उलट त्यात वाढ करू असे यावेळी नमूद केले. आम्ही हफ्ते घेणारे नसून तुमच्या खात्यात पैसे देणारे आहोत, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. एकीकडे महाविकास आघाडी सरकारची अडीच वर्षे आणि एकीकडे आमची दोन वर्षे यातील कामे काढून पहा म्हणजे दूध का दूध और पानी का पानी झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## संसदेचे हिवाळी अधिवेशन २५ नोव्हेंबर ते २० डिसेंबरपर्यंत चालणार

**नवी दिल्ली ।प्रतिनिधी**

**लोकसभेचे १८ वे हिवाळी अधिवेशन २५ नोव्हेंबरपासून सुरू होणार असून ते २० डिसेंबरपर्यंत चालणार आहे. २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनानिमित्त संयुक्त अधिवेशन होणार आहे. जुन्या संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये हे अधिवेशन होणार आहे. संविधानाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त संविधान दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे., अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी ट्विट करून दिली आहे.**




दरम्यान २६ नोव्हेंबर रोजी संविधान स्वीकारल्याच्या ७५व्या वर्धापन दिनानिमित्त साजरा केला जाणारा संविधान दिनाचा कार्यक्रम संविधान सदनच्या सेंट्रल हॉलमध्ये साजरा केला जाईल, असे देखील ट्विट संसदीय कामकाज मंत्री रिजिजू यांनी आपल्या ट्विटर संदेशात नमूद केले आहे.

## मुख्यमंत्री एकनाथराव शिंदेंच्या वचनपूर्तीमुळे मायभगिनीत उत्साह

शब्दाला जगणारा नेता म्हणून ओळख

मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे हे दिलेला शब्द पूर्ण करणारे मुख्यमंत्री म्हणून ओळखले जात आहेत. महिलांसाठी लाडकी बहीण योजना, तीन मोफत सिलेंडर देणारी अन्नपूर्ण योजना आणि मुलींना उच्च शिक्षण देण्यासाठी कार्यान्वित केलेली मोफत शिक्षण योजना या तीन योजनांमुळे माय-भगिनींमध्ये आणि लेकींमध्ये मुख्यमंत्र्यांबद्दल प्रचंड आस्था निर्माण झाली असून वचनपूर्ती करणारा नेता अशी त्यांची प्रतिमा जनमनात ठसली आहे.

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली,या योजनेला २८ जून २०२४ रोजी मान्यता देऊन. या योजनेमार्फत महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दर महिना रु. १,५००/- असा आर्थिक लाभ दिला आहे, आतापर्यंत प्रत्येक महिलेच्या खात्यात साडेसात हजार (७५०० रु)जमा करण्यात आले आहेत.त्यातअधिकचा बोनस देण्याचे वचन सुध्दा मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी दिलेले आहे.मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेद्वारे कुटुंबातील प्रत्येक पात्र सदस्याला तीन गॅस सिलिंडर मोफत देईल. त्यामुळे या योजनेअंतर्गत वर्षाला तीन गॅस सिलिंडर मोफत मिळणार आहेत. ५२ लाख १६ हजार ४१२ लाभार्थी कुटुंबांना योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. याशिवाय महाराष्ट्रात ६ लाखांहून अधिक महिला बचत गट कार्यरत असून त्यांची संख्या ७ लाखांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. त्यांच्या निधीची रक्कम १५,००० वरून ३०,००० रुपये करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी घेतला. राज्यातील २० लाख मुलींना या योजनेचा लाभ होणार आहे. एकूण ६०० अभ्यासक्रमांसाठी ही योजना लागू आहे. यात पदवीच्या बीए (कला), बीएससी (विज्ञान), बीकॉम (वाणिज्य) या पारंपरिक कोर्सेसचा समावेश तर आहेच. शिवाय, वैद्यकीय (एमबीबीएस),अभियांत्रिकी शिक्षण, लॉ, बीएड, फार्मसी, अग्रीकल्चर, व्यवस्थापकीय कोर्सेस, इतर खासगी प्रोफेशनल कोर्सेसचाही समावेश आहे



## अमेरिकेत नव्या राष्ट्राध्यक्षाची निवड, हॅरिस-ट्रम्प यांच्यात लढत

वॉशिंग्टन ।प्रतिनिधी

अमेरिकेत आज नव्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडीसाठी मतदान होत आहे. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार तसेच माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रेटिक पक्षाच्या उमेदवार तसेच सध्याच्या उपाध्यक्ष कमला हॅरिस यांच्यात ही लढत होत आहे. यांच्यातील ही लढत अत्यंत चुरशीची ठरेल असे सर्वेक्षणातून सांगितले जात आहे.

आयोवामध्ये रविवारी करण्यात आलेल्या सर्वेक्षणात डोनाल्ड्र ट्रम्प यांच्यापेक्षा कमला हॅरिस या आघाडीवर होत्या. मात्र हे सर्वेक्षण निराधार असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले होते. राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत रविवारपर्यंत साडेसात कोटी मतदारांनी मतदान केले.एनसीबीने केलेल्या सर्वेक्षणानुसार ही लढत चुरशीची होणार असल्याचे म्हटले आहेत. तसेच यावेळेस ट्रम्प आणि हॅरिस दोघांनाही ४९ टक्के मतदारांनी पाठिंबा दिला.

# शरद पवारांचे राजकीय निवृत्तीचे संकेत

बारामती ।प्रतिनिधी

मी सत्तेत नाही, राज्यसभेत आहे. अजून माझे दीड वर्ष आहे. दीड वर्षांनंतर राज्यसभेत जायचं की नाही याचा विचार मला करावा लागेल. लोकसभा मी लढणार नाही. यापुढे कोणतीही निवडणूक लढणार नाही. किती निवडणुका करायच्या. आतापर्यंत १४ निवडणुका केल्या. तुम्ही एकदाही घरी पाठवलं नाही. दरवेळी निवडून देत आहात. त्यामुळे कुठे तरी थांबलं पाहिजे. नवी पिढी समोर आली पाहिजे हे सूत्र घेऊन मी कामाला लागलो आहे, अशी भावनिक साद घालत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिले आहेत.

बारामती विधानसभा मतदारसंघात शरद पवार गटाचे उमेदवार युगेंद्र पवार यांची प्रचारसभा पार पडली. या प्रचारसभेत ते बोलत होते. त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.पवार पुढे म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी राज्याचा विचार करायचा असतो. इथल्या राज्यकर्त्यांनी इथल्या राज्यातील लोकांच्या हितासाठी जी धमक दाखवायची ती दाखवत नाहीत. त्याचा परिणाम म्हणजे आमचं काम दुसरीकडे चाललं आहे. ते थांबवायचं असेल तर इथली सत्ता बदलली पाहिजे. सत्ता बदलण्याशिवाय गत्यंतर नाही. शेतीला पाणी आणि हाताला काम यासाठी अधिक लक्ष देण्याची गरज आहे. तरच सरकारचा दृष्टीकोन चांगला राहतो. दुर्देवाने दिल्ली आणि राज्याचे राज्यकर्ते त्या दृष्टीने काम करत नाहीत.

माणसं मला ओळखतात. मी त्यांना ओळखतो. कुणाचं काय करायचं



कसली भावना कसलं काय. काम करणं महत्त्वाचं आहे. तुम्ही भारी आहात, तुम्ही मतदान करायला कधी चुकता? कालची निवडणूक ताईंची झाली. ताईंची निवडणूक काय साधी होती का? निवडणूक घरातीलच होती. पण तरीही बारामतीकर भारी आहेत. या तालुक्याने ताईंना ४८ हजार मते अधिक दिले. हे काम तुम्ही केलंय. आताही तुम्ही मागे पाहणार नाही. त्यामुळे मला चिंता नाही. उद्याच्या निवडणुकीत हाच दृष्टीकोन ठेवा, असे आवाहनही पवारांनी यावेळी केले


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT